**MHKO120003082020**

# नियमीत दिवाणी दावा क्र. ८५/२०२० मधील

## नि. ५१ वरील आदेश

(सचिन वि. नामदेव)

प्रस्तुतचा अर्ज वादीने, मयत प्रतिवादी क्र. ५ क यांचे वारस रेकॉर्ड वर आणणेकरिता दि. प्र. सं. कलम २२ नियम ४ प्रमाणे दि. २९/०५/२०२३ रोजी दिला आहे.

२. प्रस्तुतचा दावा वादीने वाटप, हक्कज्ञापन व कायम मनाई मिळण्यासाठी केला आहे.

३. वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जात असे कथन केले आहे की, सदर प्रकरणात प्रतिवादी क्र. ५ क हे दि. २३/०४/२०२३ रोजी मयत झाले असलेने वादीचा दावा वाअपाचा व इतर कारणांसाठी असलेने या दाव्याच्या कामी मयत प्रतिवादी क्र. ५ क चे वारस रेकॉर्डवर आणणे गरजेचे आहे, त्यासाठी दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी.

४. प्रस्तुतच्या प्रकरणात मयत प्रतिवादी क्र. ५ क यांचे संभावित वारसांना नोटीस बजावणी झाली असून वारसांतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी दि. ११/०३/२०२५ रोजी म्हणणे दिले आहे. असे असले तरी वादीचे अर्जावर संभावित प्रतिवादी यांनी दि.प्र.सं. तील तरतुदीप्रमाणे विहीत मुदतीत म्हणणे दाखल न करता उशीरा म्हणणे दाखल केले आहे, त्यामुळे, त्यांचे म्हणणे याकामी विचारात घेता येणार नाही. त्यामुळे, अर्ज विना म्हणणे चालविणेत आला.

५. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

६. प्रस्तुतच्या दाव्यामध्ये अद्याप मुद्दे काढलेले नाहीत त्यामुळे दि. प्र. सं. आदेश ६ नियम १७ चे परंतूक (due diligence proviso) लागु होत नाही. अशा वेळेस उदारमतवादी (liberal approach) घेणे जरुरीचे आहे. तसेच नियम हे न्याय साध्य करण्यासाठी आहेत. (Rules are made handmaid of justice) या संकल्पनेचा विचार

करणे आवश्यक आहे.

७. वादी यांचा प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटत असलेने तसेच दावा गुण–दोषावर चालविणेकरिता मयत प्रतिवादी क्र. ५क यांचे वारस दाव्यात समाविष्ठ करणे आवश्यक आहे असे न्यायालयाचे मत झालेने सबब, मी खालील आदेश पारीत करतो.

| | |
|---|---|
| **आ दे श** | |
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | मयत प्रतिवादी क्र. ५ क यांचे वारसांना या दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणुन सामील करणेस परवानगी देण्यात येते. वादीने तशी दुरुस्ती पुढील तारखेस करावी व तशी दुरुस्ती प्रत प्रतिवादींना द्यावी. |
| **(खुल्या न्यायालयात जाहीर )** | |

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE Date: 2025.09.25 10:12:49 +0530

**गारगोटी.**

दिनांक– २३/०९/२०२५

**(नि. दि. रुद्रभटे)**

दिवाणी न्यायाधीश क.स्तर

गारगोटी